# ।। लेखनक्रियानिरूपण ।।

## समर्थ रामदास स्वामीकृत दासबोधातील एकोणिसाव्या दशकातील पहिला समास

समर्थ रामदास स्वामीकृत दासबोधातील एकोणिसाव्या दशकातील पहिला समास म्हणजे लेखनक्रिया निरूपण.

याविषयाची प्रस्तावना आणि सगळ्या ओव्यांचे अर्थ.

## विवरण : के.वि.बेलसरे

संग्राहक: प्रसन्न प्रकाश हळबे

# प्रस्तावना

आजचं युग हे विज्ञानयुग आहे. शिक्षणाचा खूप प्रसार झालेला दिसतो. एवढं असूनदेखील आपल्या देशातील जवळजवळ तीस टक्के जनता निरक्षर आहे. या पार्श्वभूमीवर श्रीशिवरायांच्या म्हणजेच समर्थांच्या काळात परिस्थिती कशी असेल याची आपण कल्पना करू शकतो. त्यांच्या काळात साक्षरतेचं प्रमाण अत्यल्प होतं. पण समर्थांनी आपल्या मठांमध्ये साक्षरतेचा प्रसार केला. समर्थांच्या शिष्यगणांनी लिहून काढलेले सुमारे चार हजार ग्रंथ धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिरात उपलब्ध आहेत. समर्थांचा प्रत्येक मठ हे एक विद्यापीठच होतं. आणि समर्थांचा महंत म्हणजे चालतं बोलतं विद्यालयच होतं.

श्रीसमर्थांनी लेखनाची एक विशिष्ट शैली विकसित केली होती. त्याकाळी मुद्रणकला भारतात अस्तित्वात नव्हती. त्यामुळं ग्रंथ छापले जात नसत. आपल्याल हवा असलेला ग्रंथ पूर्णपणे लिहून काढावा लागायचा. समाजातल्या फार थोड्या विद्वान मंडळींकडे अशा प्रकारच्या हस्तलिखित ग्रंथांचा साठा असायचा. समर्थ रामदास आणि त्यांची शिष्यमंडळी अशा विद्वान लोकांची घरं शोधत आणि त्यांच्या घरातल्या बहुमोल अशा हस्तलिखित ग्रंथांच्या नकला करत. त्यासाठी शिष्य साक्षर असावा लागायचा.

समर्थांचे बहुतेक शिष्य दहा ते वीस वर्षांच्या वयोगटातले असल्यामुळं त्यांचं शिकण्याचंच वय होतं. हस्ताक्षर कसं असावं याविषयी समर्थांनी आपल्या शिष्यांना संथा दिल्या.

समर्थांनी उत्तम हस्ताक्षराचा एक कित्ता तयार केला होता. ज्याला लिहायला येतं आहे अशा शिष्याला ते तो कित्ता गिरवायला द्यायचे. त्याआधारे शिष्याकडून अक्षरं घोटून घ्यायचे.

कल्याणस्वामी, केशवस्वामी, वेणास्वामी या सगळ्या समर्थशिष्यांची अक्षरं उपलब्ध असून हे सारेजण सुंदर लिहीत असत. खुद्द समर्थांचं अक्षरदेखील उत्तम होतं. त्यांनी वयाच्या पंधराव्या वर्षी लिहून काढलेलं वाल्मिकी रामायण आजही उपलब्ध आहे. त्यांच्या त्या रामायणात काही उत्तम चित्रंदेखील आहेत. त्यावरून असं कळतं की, समर्थ हे उत्तम चित्रकारदेखील होते.

कल्याणस्वामींच्या हस्ताक्षरातली दासबोधाची प्रत आजही डोमगाव इथं पहायला मिळते. त्यामध्ये अतिशय सुंदर नक्षीकाम आहे. समर्थ लिहिताना चारही बाजूला समास सोडून लिहायला सांगत तेव्हा शिष्यमंडळी समासात नक्षीकाम करत. वेणास्वामींनी पन्नास वर्षांच्या आयुष्यात दोनशे ग्रंथांच्या नकला केल्या होत्या. यवरून समर्थांनी सहित्य आणि विचार यांचा किती प्रचार केला होता हे लक्षात येतं.

त्याकाळात कागद सहज उपलब्ध होत नव्हते. लिखाणासाठी आत्तासारखी सामुग्री नव्हती. अनेकदा कागद आणि शाई तयार करायला विशिष्ट साहित्य लागायचं. या साहित्यात हिंगूळ, कापसाचे बोळे, शाईत भिजवून ठेवलेली चिंधी, वाळलेला अळता, पारा, गंधक, लाख असं साहित्य संग्रही ठेवावं लागायचं. वेगवेगळ्या प्रकारचे बोरू तासून ठेवलेले असायचे. सुंदर हस्ताक्षराबरोबरच जुजबी चित्रकलेचं ज्ञानही असावं लागायचं. कारण ग्रंथामध्ये विषयाला साजेशी चित्रं काढावी लागायची.

यावरून आजची सचित्र पुस्तकांची कल्पना समर्थांच्या डोक्यात किती पूर्वीपासून होती, ते लक्षात येईल. समर्थांच्या शिष्यांनी लिहून काढलेल्या भगवद्गीतेच्या एका हस्तलिखितात जवळपास शंभर चित्रं काढलेली आहेत. त्यामध्ये विभूती योगातील सर्व विभूतींची चित्रं आहेत.

लिहून ठेवलेला ग्रंथ जपून ठेवणं हे काम त्याकाळात फार जिकिरीचं होतं. पाण्याचा किंवा तेलाचा डाग पडू नये, उंदरांनी कुरतडून खाऊ नये, वाळवी लागू नये या सगळ्या गोष्टींची काळजी घ्यावी लागायची. अशा प्रकारे लिहिलेल्या ग्रंथाची निगा राखली जायची.

**ब्राह्मणे बाळबोध अक्षर। घडसुनी[१] करावे सुंदर।**

**जे देखतांचि चतुर। समाधान पावती ।।१।।**

प्रत्येकाने बाळबोध अक्षर घोटून घोटून सुंदर करावे. ते अक्षर पाहून चतुरांना समाधान वाटावे.

१. घडसुनि : घोटून / गिरवून.

**वाटोळें सरळें मोकळें। वोतलें मसीचें[१] काळें।**

**कुळकुळीत वळी[२] चालिल्या ढाळें। मुक्तामाळा जैशा ।।२।।**

अक्षर नेहमी वाटोळे, मोकळे आणि सरळ असावे. ते काळ्या शाईने लिहिलेले असावे आणि काळे कुळकुळीत दिसावे. ओळी अशा दिसाव्यात की जणू काय त्या मोत्यांच्या माळाच आहेत..!

१. मसी : शाई २. वळी : ओळी

**अक्षरमात्र तितुकें नीट। नेमस्त पैस[१] काने नीट।**

**आडव्या मात्रा त्याहि नीट। आर्कुलीं[२] वेलांड्या[३] ।।३।।**

प्रत्येक अक्षर नीट काढलेले असावे. प्रत्येक शब्दात सारखे अंतर अस्सवे. काने आणि आडव्या मात्रा, तसेच शिरोरेखा देखील नीट असाव्यात. त्याचप्रमाणे रफार आणि वेलांट्याही नीट पाहिजेत.

१. पैस : ऐसपैस २. आर्कुली : रफार ३. वेलांड्या : वेलांट्या

**पहिलें अक्षर जें काढिलें। ग्रंथ संपे तों पाहात गेले।**

**येका टांकेंचि लिहिलें। ऐसे वाटे ।।४।।**

ग्रंथ सुरवात करताना पहिल्या अक्षराचे जे वळण आहे, तेच वळण ग्रंथ संपेपर्यंत तो एकाच टाकाने लिहिला आहे असे वाटावे.

**अक्षराचें काळेपण। टांकांचें ठोंसरपण[१]।**

**तैसेंचि वळण वांकाण। सारिखेंचि ।।५।।**

ग्रंथातील अक्षराचा काळेपणा, टाकाचा टणकपणा आणि अक्षरांची वळणे, वांकणे ही सुरवातीपासून ते अखेरपर्यंत एकसारखीच असावीत.

१. ठोसरपण : टणकपणा

**वोळीस वोळी लागेना। आर्कुली मात्रा भेदीना।**

**खालिले वोळीस स्पर्शेना। अथवा लंबाक्षर ।।६।।**

ओळीला ओळ लागू नये. रफारीने मात्रेला छेदू नये. अक्षराचा खालच्या ओळीला स्पर्श होऊ देऊ नये. तसेच अक्षर लांबट असू नये.

**पान शिषानें रेखाटावें। त्यावरी नेमकेचि ल्याहावें।**

**दुरी जवळी न व्हावें। अंतर वोळीचें ।।७।।**

शिसाने पानावर रेघा आखाव्यात. त्यावर ठरलेली शब्दसंख्याच लिहावी. सर्व ओळींमधील अंतर अगदी सारखे असावे. ओळी फार दूर वा जवळ नसाव्यात.

**कोठें शोधासी आडेना। चुकी[१] पाहातां सांपडेना।**

**गरज[२] केली हें घडेना। लेखकापासुनी ।।८।।**

कुठी एखादा संदर्भ शोधायचा असेल तर अडचण पडू नये. लिहिण्यात शोधून देखील चूक सापडू नये. लिखाणात लेखकाने हेळसांड केली असे घडू नये.

१. चुकी : चूक        २. गरज : हेळसांड

**ज्याचें वय आहे नूतन। त्यानें ल्याहावें जपोन।**

**जनासी पडे मोहन। ऐसें करावें ।।९।।**

ज्याचे वय लहान आहे, त्याने फार जपून लिहावे. आपण लिहिलेले पाहण्याचा मोह लोकांना होईल असे लिखाण असावे.

**बहु बारीक तरुणपणीं। कामा नये म्हातारपणीं।**

**मध्यस्त[1] लिहिण्याची करणी। केली पाहिजें ।।१०।।**

तरूणपणी फार बारीक अक्षर काढलेले चालेल. पण म्हातारपणी ते वाचतादेखील येणार नसेल, तर त्याचा काय उपयोग? म्हणून मध्याम आकाराचे अक्षर काढण्याची सवय केली पाहिजे.

१. मध्यस्त : मध्यम आकाराचे

**भोंवते स्थळ सोडून द्यावें। मधेंचि चमचमीत[1] ल्याहावें।**

**कागद झडतांहि झडावें। नलगेचि अक्षर।।११।।**

आपण जे लिहितो, त्याच्याभोवती समास सोडून द्यावा आणि मध्येच छान स्पष्ट आणि ठसठशीत लिहावे. कालंतराने कागद झडला तरी अक्षरे सुरक्षित रहावी.

१. चमचमीत : स्पष्ट व ठसठशीत

**ऐसा ग्रंथ जपोनि ल्याहावा। प्राणीमात्रांस उपजे हेवा।**

**ऐसा पुरुष तो पाहावा। ह्मणती लोक।।१२।।**

अशा रीतीने ग्रंथ अगदी जपून लिहून काढावा. लोकांना त्याचा हेवा वाटला पाहिजे. इतका सुंदर ग्रंथ लिहिणारा पुरुष कोण आहे, त्याला एकदा पहावा असे लोकांना वाटले पाहिजे.

**काया बहुत कष्टवावी। उत्कट कीर्ति उरवावी।**

**चटक लाउनी सोडावी। कांही येक।।१३।।**

अशाप्रकारे ग्रंथ लिहिण्यामध्ये आपले शरीर खूप झिजवावे. आपल्यमागे आपली उत्तम कीर्ती उरेल असे वागावे. लोकांना आपल्यबद्दल उत्कंठा वाटली पहिजे असेच आपण करावे.

**घट्य[1] कागद आणावे। जपोन नेमस्त खळावे।**

**लिहिण्याचे सामे[2] असावे। नानापरी।।१४।।**

चांगला घट्ट कागद आणावा. तो काळजीपूर्वक नीट खळावा. त्याच्यावर लिहिण्यासाठी लागणारे नाना प्रकारचे साहित्य जवळ असावे.

१. घट्य : घट्ट     २. सामे : साहित्य

**सुऱ्या कातऱ्या जागाईत[1]। खळी घोंटाळें तागाईत[2]।**

**नाना सुरंग मिश्रित। जाणोनि घ्यावें।।१५।।**

सुऱ्या, कात्र्या, समासफळ्या, खळ, घोटा, खळ लावण्याचा ब्रश, चाकू आणि सुरीला धार लावण्याचे सहाणेसारखे रंगीत दगड मिळतात. ते नीट पाहून घ्यावे.

१. जागाईत : समासफळी     २. तागाईत : सुरीला धार लावण्याचे सहाणेसारखे रंगीत दगड

**नाना देसीचे बरू[१] आणावे। घटी बारिक सरळे घावे।**

**नाना रंगाचे आणावे। नाना जिनसी।।१६।।**

निरनिराळ्या देशांतून बोरू मागवावे. त्यापैकी जे घट्ट, टणक, बारीक असतील ते वापरायला घ्यावे. अनेक रंगांचे अनेक प्रकारचे बोरू जवळ ठेवावे.

१. बरू : बोरू

**नाना जिनसी टांकतोडणी। नाना प्रकारें रेखाटणी।**

**चित्रविचित्र करणी। सिसेंलोळ्या[१]।।१७।।**

बोरूचे टोके छाटण्यासाठी अनेक प्रकारच्या टाक तोडण्या असाव्या. अनेक प्रकारच्या ओळी आखण्याच्या पट्ट्या किंवा रूळ असावे. लिहिलेला ग्रंथ सुंदर दिसावा म्हणून अनेक प्रकारची चित्रे काढावी व कलाकुसर करावी. वजनासाठी शिसाच्या गोळ्या ठेवाव्यात.

१. सिसेंलोळ्या : शिसाच्या गोळ्या

**हिंगुळ[१] संग्रहीं असावे। वाळले अळिते[२] पाहोन घ्यावे।**

**सोपें[३] भिजउनी वाळवावे। संग्रह मसींचे।।१८।।**

हिंगुळ आपल्या संग्रही ठेवावे. वाळलेला आळता पाहून जवळ ठेवावा. निरनिराळ्या शाईचे सोपे भिजवून वाळवून संग्रही ठेवावे.

१. हिंगुळ : लाल पदार्थ  २. अळिते : कापसाचा बोळा  ३. सोपा : शाईत बुडवून ठेवलेली चिंधी.

**तगटी इतिश्र्या कराव्या। बंदरी फळ्या घोटाव्या।**

**नाना चित्रीं चिताराव्या। उंच चित्रें।।१९।।**

ग्रंथ लिहून झाल्यावर ''इतिश्री'' असे लिहावे. सुरत, मलबार बंदरातून आलेल्या उत्तम प्रतीच्या सागवानाच्या फळ्या घोटून घोटून समान व गुळगुळीत कराव्या. त्यावर उत्तम प्रकारची सुंदर चित्रे काढावी.

**नाना गोप नाना बासनें। मेणकापडें सिंदुरवर्णें।**

**पेट्या कुलपे जपणें। पुस्तकाकारणें।।२०।।**

ग्रंथ लिहून झाल्यावर तो चांगल्या रीतीने बंधून ठेवणे फार आवश्यक असते. म्हणून त्यासाठी अनेक प्रकारचे विणलेले दोर, ग्रंथ बांधण्यास अनेक प्रकारची वस्त्रे, शेंदरी रंगाचे मेणकापड, पेट्या, कुलपे, वगैरे ग्रंथ जपून ठेवण्याची साधने संग्रही असावीत. त्या काळी पुस्तके बांधून घेण्याची (बाइंडिंग) पद्धत नव्हती. सगळी पाने सुटी असत. शिवाय ग्रंथ कपाटामध्ये न ठेवता पेट्यांमध्ये ठेवत.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे लेखनक्रियानिरूपणनाम समास प्रथम**